स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या
सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील
पी.एच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोध
प्रबंधाचा अंतिम आराखडा.

''मराठवाडयातील दुष्काळाचे आर्थिक व सामाजिक परिणाम -विशेष संदर्भ लातूर जिल्हा''

संशोधक

पाटील सचिन मोहनराव
एम.ए., एम. फिल. (अर्थशास्त्र) बी.एड्.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एल.एच. पाटील
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
ता. उदगीर, जि. लातूर.

मार्च - २०१६

''मराठवाडयातील दुष्काळाचे आर्थिक व सामाजिक परिणाम - विशेष संदर्भ लातूर जिल्हा''

प्रस्तावना :-

दुष्काळ म्हणजे पाण्याची व त्यायोगे अन्नस्त्रोतांची अनुपलब्धता किंवा तीव्र टंचाई असलेला, अनेक महिन्यांचा व वर्षाचा दीर्घ कालखंड होय. दुष्काळ येण्यास वातावरणातील आकस्मित बदल, वृक्षतोड किंवा ज्वालामुखीचे उद्रेक किंवा वणवे इत्यादी कारकांनी उध्दवलेले पर्यावरणीय जलचक्रातील दोष कारण असू शकतात. दुष्काळात अन्नपाण्याच्या अभावी माणसांसह बहूसंख्य सजीवांना प्राणसंकटास तोंड दयावे लागते जेथे दुष्काळ पडतो. त्या ठिकाणी उत्पादकता वसणूक पुन्हा सावरणे खूप कठीण असते. तेथे जीवन पूर्ववत होण्यास अनेक वर्ष लागू शकतात.

मराठवाडयाच्या वाटयाला सततचा दुष्काळ, गारपीट व अवेळी पडणारा पाऊस यामुळे नापिकी वाढत आहे. सद्यस्थितीत सतत तीन वर्षातील नापिकीमुळे शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. विहिरीला पाणी नसताना विजेची भरमसाठ बिले शेतकऱ्यांच्या माथी मारण्यात आली. कर्जबाजारीपणामुळे मुलींच्या लग्नांची चिंता, पशुधन वाचवण्याचे कसे ? घरात खाण्यासाठी धान्य नाही. त्यामुळे गावात तोंड दाखवायला जागा राहिली नाही. सग्या-सोयऱ्याकडून मदत मागवी तर त्यांची सुध्दा तीच आवस्था आहे. मराठवाडयात पुरूष शेतकरी आत्महत्या मोठया प्रमाणात झाल्या आहेत. गेल्या 11 महिन्यांत 410 मराठवाडयातील शेतकऱ्यांनी मृत्यूला जवळ केले आहे. परंतू आता मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या बायकांनीसुध्दा धीर सोडला असून त्या आत्महत्या करू लागल्या आहेत.

मराठवाडयाचे खरीपक्षेत्र 52 लाख 54 हजार इतके आहे. त्यापैकी 37 लाख 29 हजार हेक्टर क्षेत्रात पेरणी झाली पैकी 10 हजार हेक्टरवर दुबार पेरणीचे संकट आले. त्याचबरोबर मुग, उडीद, सोयाबीन पिकांची वाढ खुंटली. कपाशीनेही मान टाकली आहे. यंदा तब्बल 70% उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.लातूर जिल्हयातील 3 लाख 69 हजार हेक्टरपैकी 48 हजार हेक्टरमध्ये पेरणीच झाली नाही. 2 लाख हेक्टर क्षेत्रातील पेरणी वाया गेली आहे. एकटया लातूर जिल्हयात शेतकऱ्यांच्या नुकसानीचा आकडा

साडेतीन हजार कोटीवर गेला आहे. तसेच मराठवाडयाची शान व ओळख असलेला मोसंबी शेवटचा घटका मोजत आहे. तीन वर्षाच्या दुष्काळामुळे 2 लाख 50 हजार एकरावरील मोसंबीच्या बागा जळून गेल्या. त्यामुळे मराठवाडयाच्या शेतकऱ्यांच्या घरात दरवर्षी येणारे 500 ते 600 कोटी रूपये थांबले आहेत. त्यामुळे मराठवाडयातील व विशेषत: लातूर जिल्हयांतील शेतकऱ्यांचा व शेतमजुरांचा आर्थिक कणा मोडला आहे.

मराठवाडयात आज सर्वात मोठी चिंता आहे ती पशूधनाच्या चाऱ्याची मराठवाडयात सुमारे 55 लाख पशुधन आहे. बीड उस्मानाबाद लातूर जिल्हयांतील परिस्थिती चाऱ्याच्या संदर्भात अतिशय भयावह आहे. लातूर जिल्हयांचे उदाहरण घेतले तर 737 लाख जनावरांना तीन हजार मेट्रिक टनाची आवश्यकता आहे. मराठवाडयाची रोजची गरज 20 ते 25 हजार मेट्रिक टन चाऱ्यांची आहे. यासाठी राज्यसरकार कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, आंध्रप्रदेश इत्यादी राज्यामधून पशुखादय खरेदी करत आहे.

आज मराठवाडयात 870 गावे आणि 450 वाडयांना दुष्काळाचा फटका बसला आहे. मोठे, मध्यम आणि लघू प्रकल्पांची संख्या 817 आहे. त्यात केवळ 07% जलसाठा उपलब्ध आहे. लातूर शहरासह अन्य गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा व साई मध्यम प्रकल्पातील पाणी संपल्याने तब्बल महिन्याला दोन वेळा पिण्याची पाण्याची पुरवठा केला जात आहे. आतातरी लातूरला रेल्वेने पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे लातूरला पिण्यास पाणी नाही तर उदयोगाचे काय? हा प्रश्न व्यापक बनला आहे. याचा परिणाम लातूर जिल्हयातील उदयोग बंद पडले तर जवळपास आज 53 उदयोगांचे इतर ठिकाणी स्थलांतर होत असताना दिसून येत आहे.

मराठवाडयावर दुष्काळांचा फक्त आर्थिक परिणाम झाला नसून, सामाजिक व इतर परिणाम सुध्दा झाले आहेत. दुष्काळामुळे मराठवाडयातील लोकांचे जगनेच मुश्कील झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अनेक मुला मुलींना शिक्षण थांबवावे लागले आहे. काही गावामध्ये मुलांना पाण्यासाठी शाळा सोडावी लागली आहे. पैसे नसल्यामुळे गेल्या तीन वर्षापासून मुलींचे लग्न थांबले आहेत. शेतात पिक नसल्यामुळे काही तरूणांनी शहराची वाट धरलेली आहे. पण दुष्काळ पडला की शहरात व्यावसायिक मजुरांची कमी मजुरी देवून आर्थिक पिळवणूक करतात. त्यामुळे शहरात येवूनही या तरूणांचे पोट भरत नाही. शहरी भागात स्थलांतराचा प्रश्न निर्माण होतो. दुष्काळामुळे पोट

भरणे अवघड असल्यामुळे लोक चोरी, लुटमार इत्यादी गुन्हेगारी पातळीकडे वळलेले दिसून येतात.

मराठवाडा दुष्काळाच्या झळांनी होरपळून निघाला असताना झळा कमी करून दुष्काळग्रस्त जनता व जनावरांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने राज्यास 1207 कोटींचे पॅकेज जाहीर केले आहे. तसेच राज्यशासनाने टँकरने पाणीपुरवठा, चारा छावण्या, शेततळी, अनुदान, रोजगार हमी योजना इत्यादी मार्गाने दुष्काळग्रस्त भागास मदत करत आहे. गेल्या तीन वर्षात दुष्काळाशी सामना करताना तब्बल सहा हजार कोटी खर्च झाले आहे. पण कोटयावधी रूपये खर्च करूनही आज मराठवाडा भीषण दुष्काळाला सलग चौथ्या वर्षी समारे जात आहे. म्हणजेच मोठ मोठया पॅकेजने दुष्काळाचे निवारण होत नाही. तर दुष्काळाचा सामना करण्याची ती तात्पुरती मदत असते. दुष्काळाचे निवारण करणारे जगात कोणतेच पॅकेज नाही. निवारणासाठी मानवाने प्रमाणिक पर्यत्न करणेच एकमेव पॅकेज आहे. मृदासंधारण, जलसंधारण, नैसर्गिक जैवविविधता टिकवून ठेवण्यासारखे कार्य निसर्गासाठी नसून मानवतेसाठीच वरदान असल्याचे माणूस समजून घेईल तेव्हा खऱ्या अर्थाने दुष्काळ निवारण झाल्याशिवाय राहणार नाही. दुष्काळासाठी फक्त शासनाच जबाबदार धरून चालणार नाही तर प्रत्येक माणसांस निवारणाचे व्रत घ्यावे लागेल.

❖ समास्यसुत्रण :-

सदरील "मराठवाडयातील दुष्काळाचे आर्थिक व सामाजिक परिणाम- विशेष सदर्भ लातूर जिल्हा" संशोधनात दुष्काळी परिणामाचा अभ्यास करीत असताना लातूर जिल्हयातील दुष्काळाचे कारणे कोणती? शेतकऱ्यांच्या उत्पादनात घट किती? शेतकरी आत्महत्या प्रमाण किती? शिक्षण व्यवस्थेवरील परिणाम, आरोग्य सेवेवरील परिणाम, पाणीपुरवठा स्थिती, जिल्हया बहेरील स्थलांतर प्रमाण, दुष्काळ व पाणी टंचाई मुळे उदयोगावर झालेला परिणाम इत्यादी घटकांचा शोध घेणे. तसेच विकासावरील आर्थिक व सामाजीक परिणाम कोणते हा अभ्यासामागचा मुख्य हेतू होय.

❖ संशोधनाचे उद्दिष्टये :-

संशोधन समस्येचे अध्यायन करीत असताना समस्येच्या अनेक पैलुचा अभ्यास करावा लागतो. परंतू त्यामुळे संशोधनाला योग्य दिशा आणि गती मिळू शकत नाही. म्हणून संशोधनाचे उद्दिष्टे निर्धारित करून त्यावर संपूर्ण लक्ष केद्रित उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. मराठवाडयातील दुष्काळजन्य परस्थितीचा आढावा घेणे
२. लातूर जिल्हयातील दुष्काळी परस्थितीचा चिकित्सक अभ्यास करणे.
३. मराठवाडा व लातूर जिल्हयातील दुष्काळजन्य परस्थितीच्या कारणांचा शोध घेणे.
४. दुष्काळी परस्थितीमुळे लातूर जिल्हयातील झालेल्या आर्थिक परिणामांचा शोध घेणे.
५. दुष्काळजन्य परस्थितीमुळे लातूर जिल्हयातील झालेल्या सामाजिक व इतर परिणामांचा अभ्यास करणे
६. दुष्काळ निवारण करण्यासाठी केलेल्या शासकीय योजनाचा आढावा घेणे.

❖ संशोधनाचे गृहितके :-

संशोधकाने अध्ययनाचे उद्देश, महत्व लक्षात घेवून संशोधनास योग्य दिशा देण्याकरीता खालील गृहितके मांडलेली आहेत. ते संशोधनाचा फलयुक्त आधार आहे.

१. मराठवाडयात महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत सरासरी पर्जन्यमान कमी आहे.
२. लातूर जिल्हयातील दुष्काळजन्य परस्थिती निर्माण होण्यास जिल्हयातील ऊस उत्पादक व साखर उदयोग जबाबदार आहेत.
३. लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांचा कृषी उत्पादनाचा कल खरीप पिकांऐवजी बागायती पिक लागवडीकडे झुकलेला आहे.
४. दुष्काळी परस्थितीमुळे लातूर जिल्हयातील विकासावर परिणाम झालेला आहे.
५. दुष्काळ निवारण्यासाठी शासनाकडून मिळालेला निधी लातूर जिल्हयास अपूरा पडत आहे.

❖ संशोधन पध्दती :-

"मराठवाडयातील दुष्काळाचे आर्थिक व सामाजिक परिणाम- विशेष सदर्भ लातूर जिल्हा" या संशोधन विषयासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीचा आधार घेण्यात येणार आहे. लातूर जिल्हयातील दुष्काळाच्या परिणामांचा आढावा घेत असताना संशोधनाशी संबंधीत असणाऱ्या प्राथमिक व दुय्यम साधनांचा अवलंब संशोधनात केला आहे.

प्राथमिक साधने :-

लातूर जिल्हयातील विविध तालुक्यातील लोकांच्या प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, प्रश्नावली, अनुसुची इ. प्राथमिक स्त्रोताचा वापर करणार आहे.

दुय्यम साधने :-

संशोधन विषयाशी संबधित असणारे संदर्भ ग्रंथ, विविध विद्यापीठातील अप्रकाशीत शोध प्रबंध व शासकीय अहवाल यांचा आधार घेतला आहे. प्रस्तुत शोध प्रबंधसाठी वर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासीके, त्रैमासिक, परिसंवाद व चर्चासत्रातील शोधनिंबध व विविध संकेतस्थळाचा आधार घेतला आहे.

नमुना निवड :-

संशोधकाने "मराठवाडयातील दुष्काळाचे आर्थिक व सामाजिक परिणाम- विशेष सदर्भ लातूर जिल्हा" या संशोधनात नमुना निवडीच्या संभाव्य नमुना निवड पध्दतीचा वापर केलेला आहे. संशोधनासाठी लातूर जिल्हयातील दहा तालूक्याची निवड केली असून त्या तालूक्यातील प्रत्येकी दहा गावामध्ये पाच लाभार्थ्यांची निवड केली. एकूण ५०० लाभार्थ्याची निवड करण्यात आली असून ५०० प्रश्नावलीच्याद्वारे तथ्यसंकलन करण्यात येणार आहे.

अनुभववादी औपचारीक व अनौपचारिक साहित्याचा उपलब्धीनुसार ऐतिहासीक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब प्रस्तुत संशोधनासाठी केला आहे.

❖ संशोधनाचे महत्व :-

दरडोई व दरहेक्टरी पाणी उपलब्धता कमी असताना ही जलविकासाच्या सर्वच पर्यायांच्या प्रक्रिया धड अंमलात न आणने व जल व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष करणे या प्रकारामुळे पाण्याची व्यवस्था मुळांतच धडधाकत नव्हती. कमी पावसामुळे ती उघडी पडली. वाळू व भूजलांचा अमर्याद उपसा आगीत तेल ओतणारा ठरला. प्रादेशीक अनुशेष, पाण्याचे संरजामी राजकारण, टँकर व बाटली बंद पाण्याचा व्यापार आणि ऊसाला आग्रक्रम देण्याने दुष्काळ जास्त तीव्र झाला. या घटकांमुळेच आज जिल्हयांत दुष्काळ सदृश्य स्थिती वारवांर दिसत आहे. दुष्काळी परस्थितीने दुष्काळी भागातील अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडते. कारण दुष्काळ हा त्या सर्व भागातील अर्थकारण व सामाजकारण बिघडवतो. दुष्काळी भागातील सामाजिक व आर्थिक बाबीवर गंभीर परिणाम दिसून येतो.

म्हणून या संशोधनात दुष्काळामुळे जिल्हयांवरील सामाजिक व आर्थिक परिणाम कोणते? व त्यावरील उपाय कशा पध्दतीने केले जावू शकतात. याचा अभ्यास करावयाचा हेतू ठेवला आहे.

❖ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

सदरील संशोधन हे लातूर जिल्हातील दुष्काळ एवढे मार्यादीत आहे. तसेच लातूर जिल्हयातील विकासावर दुष्काळामुळे आर्थिक , सामाजिक व इतर घटकांच्या परिणामांचा अभ्यासावर भर देण्यात आला आहे.

❖ संशोधनाचा कालखंड :-

सदरील संशोधन हे सन २०११-१२ ते सन २०१५-१६ हा कालावधी घेतलेला आहे.

प्रकरण रचना

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना करीत असताना विषयाची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली. तसेच संशोधन विषयाची सखोलता स्पष्ट करून रुपरेषा स्पष्ट करण्यात आली आहे. त्यानंतर संशोधन समस्येचे विश्लेषन, संशोधनाचा उद्देश, महत्व, गृहितके व संशोधन पध्दतीविषयी माहिती देण्यात आली. तसेच संशोधनाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करून पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण दुसरे

संशोधन साहित्याचा आढावा

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच विद्यापीठात प्रकाशीत व अप्रकाशीत विषयांसंबधी संशोधनाचा वापर केलेला आहे. तसेच वर्तमानपत्रातील लेख, संदर्भ ग्रंथ इत्यादीची माहिती घेतली आहे.

प्रकरण तिसरे

लातूर जिल्हयाची अर्थव्यवस्था

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाच्या विषय व्याप्ती लातूर जिल्हा असल्यामुळे त्या जिल्हयातील आर्थिक घडामोडीचा आढावा घेताना लातूर जिल्हा विकासाचा अभ्यास करण्यात आला. यात जिल्हयातील भूमि, हवामान, नैसर्गिक साधनसंपत्ती, दळणवळण, सेवा क्षेत्र, औद्योगिकरण इत्यादी घटकांचा विकासात्मक वर्णन संशोधकाने या प्रकरणात करण्यात आले आहे.

प्रकरण चौथे

दुष्काळांचे लातूर जिल्हयातील विकासावर झालेले परिणाम

प्रस्तुत प्रकरणात संशोधकांने लातूर जिल्हयांतील विविध गावांना भेटी देवून, कार्यालयीन कागदपत्र माहिती मिळवून, प्रश्नावली संदर्भातील माहितीचा आढावा घेवून दुष्काळाचे परिणाम मांडण्यात येणार आहेत.

प्रकरण पाचवे

लातूर जिल्हयांतील दुष्काळ निवारण्यासाठी केलेल्या उपाय योजना

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने लातूर जिल्हयातील विविध कार्यालये, पंचायत समिती, शेतकरी, यांच्या भेटी घेवून व इंटरनेटवरील माहितीच्या अधारे दुष्काळावर केलेल्या उपाय योजनाचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व शिफारशी

शोध प्रबंधाच्या या अंतिम प्रकरणात वरील सात प्रकरणाच्या आधारे लातूर जिल्हयातील तालुकानिहाय मानवी विकास निर्देशांकांचा अभ्यास केल्यानंतर संशोधनाचे सार मांडण्यात आले आहेत वरील अभ्यासांतील निष्पन्न झालेले निष्कर्ष मांडून मार्गदर्शक स्वरूपाच्या शिफारशी नोंदविण्यात आल्या आहेत.

संदर्भ ग्रंथ

1. लातूर जिल्हा गॅझेटिअर भाग १ - २००८,
2. हिदुस्थानातील दुष्काळ - काल आणि आज - सखाराम गणेश मजुमदार , जावजी दादाजी कंपनी (१९०९)
3. दुष्काळांच्या दुष्टचक्रात मराठवाडयातील शेतकरी - जयाजीराव सुर्यवंशी , लेख लोकमत (०४/०४/२०१६)
4. दाहक दुष्काळ - प्रमोद माने , लेख महाराष्ट्र टाईम्स (१४/०४/२०१५)

मार्गदर्शक
प्रा. डॉ. एल.एच. पाटील
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
ता. उदगीर जि. लातूर

संशोधक
पाटील सचिन मोहनराव
एम.ए. एम. फिल. (अर्थशास्त्र) बी.एड